# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोननं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- १३३-२२ दिनांक :- ०९/०५/२०२२

## १२ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मॅफेड्रॉन) अंमली पदार्थ बाळगणाऱ्या ईसमावर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई.

दिनांक ०७/०५/२०२२ रोजी अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अंमलदार यांना गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती मिळाली की, मिरारोड (पुर्व) दिपक हॉस्पीटल येथे एक ईसम मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता येणार आहे. सदर मिळालेल्या बातमीप्रमाणे अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे अधिकारी यांनी सापळा रचून सर्व कायदेशीर बाबींची पुर्तता करुन दिपक हॉस्पीटल येथे परिसरात सापळा रचुन कारवाई केली असता ईसम मजहर आमीन शेख याचे कब्ज्यात १२ ग्रॅम वजनाचा ९६,०००/-रु. किंमतीचा मॅफेड्रॉन हा अंमली पदार्थ विक्रीकरीता बाळगला असताना मिळुन आला असुन त्याचेकडुन नमुद अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे. संपुर्ण कारवाई दरम्यान एकुण १,५१,०००/-रु. एकुण किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन नमुद ईसमाविरुध्द अंमली पदार्थ कायदा कलम ८ (क), २१ (क) प्रमाणे नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ाा ३६८/२०२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन सदर आरोपीतास अटक करण्यात आली आहे. पुढील तपास नवघर पोलीस ठाण्याकडुन चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक देवीदास हंडोरे, सपोनि विलास कुटे, पो.हवा.९२००६/धनाजी इंगळे, पो.हवा.०६०४४/ अजय सपकाळ, पो.हवा .०७०८८/सुभाष आव्हाड, पोहवा/०७०५२ विष्णुदेव घरबुडे व पो.शि. ०७१४८/अजय यादव यांनी केली आहे.

----000----